बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५३ वा | सोमवार दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### कडी कोंडा अज्ञाताने तोडून केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे फिर्यादी नामे-नेताजी अंकुश माळी, वय ४८ वर्षे, रा. राघुचीवाडी ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२२.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन पर्समधील चावी घेवून कपाटातील रोख रक्कम ५०,००० चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नेताजीमाळी यांनी दि.२२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (३), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### किराणा दुकानाचे शटर पट्टी अज्ञात तोडून केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नामे-रमेश चांगदेव बसाटे, वय ४८ वर्षे, रा. लक्ष्मीनगर परळी रोड कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे ओम साई किराणा दुकानाचे शटर पट्टी अज्ञात व्यक्तीने दि.२१.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन दुकानातील गुडनाईट लिक्वीड, हळद पावडर, गुळ, साखर, तांदुळ, संतुर साबन, चहापत्ती, लाकडी, घाणा तेल, किर्ती गोल्ड तेल, जेमिनी सुर्यफुल तेल निविया सॉफटक्रीम हारपीक, काजु,बदाम, अंजीर, अक्रोड, व इतर साहित्य असा एकुण २,४९,६६८ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रमेश बसाटे यांनी दि.२२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (४), ३०५ (ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लॅपटॉपची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अबुसुफीयान एक्बाल काझी, वय २७ वर्षे, रा. उस बी आय बॅकेजवळ ढोकी ता. जि. धाराशिव यांचे एसर कंपनीचा ३ इंटेल कोर आय ५ लॅपटॉप एकुण ३५,००० किंमतीचे हे दि. २१.०८.२०२५ रोजी ०९.०० ते १२.०० वा. सु. तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अबुसुफीयान काझी यांनी दि.२२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२२ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २५४ कारवाया करुन १,८१,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

## बोगस मतदार नोंदणी प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगयाने कारवाई करावी - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर विधानसभा-२४१ (महा) मतदारसंघात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान तालुक्यातील विविध गावांच्या मतदार यादीत बोगस मतदारांची नावे जाणूनबुजून समाविष्ट करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. साधारण सहा हजारांपेक्षा जास्त नावे मतदार यादीत समाविष्ट झाल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. या संदर्भात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी थेट केंद्रीय निवडणूक आयुक्ताकडे या अनुषंगाने पत्राद्वारे कळविले होते. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पत्राची केंद्रीय निवडणूक आयोग निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली आहे

या संदर्भात १७ ऑक्टोबर २०२४ रोजी तुळजापूरचे तहसीलदार अरविंद शंकर बोळंगे यांनी संबंधित प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये (सेक्शन १७२, ३(५), ३१८(२), ३३५, ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ६१(२), ६२) तुळजापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला होता. मात्र या प्रकरणातील तपास अधिकारी तसेच पोलीस उपअधीक्षक देशमुख यांनी राजकीय दबावामुळे किंवा जाणूनबुजून आरोपींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने याची थेट तक्रार केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती

या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यामुळे भारतीय लोकशाहीची पायाभूत मूल्ये धोक्यात येत असल्याचे नागरिकांचे मत आहे. बोगस मतदारांची नावे समाविष्ट करण्याच्या कारस्थानामुळे लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात अशा कृत्यांना प्रोत्साहन मिळण्याचा धोका असल्याचे निरीक्षण व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणातील जबाबदार आरोपींवर तसेच तपासात जाणूनबुजून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रकरणी गांभीर्याने लक्ष घालून दोषींना कायद्याच्या कचाट्यात आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे . लोकशाहीला कलंकित करणाऱ्या या प्रकरणातील दोषींवर तत्काळ कारवाई व्हावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या बोगस मतदार नोंदणीवर केंद्रीय निवडणूक आयोग काय काय करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून अशी बोगस मतदार नोंदणी करणाऱ्या राजकीय क्षेत्रातील व्यक्तींचे धाबे दणाणले आहेत.

## राज्याने शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांचा प्रश्न सोडवावा- केंद्रीय मंत्री आठवले



परंडा(प्रतिनिधी)- राज्य सरकारने गोवंश हत्या बंदी कायद्याचा फेरविचार करुन शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांचा प्रश्न मार्गी लावावा, असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी परंडा येथे पत्रकाराशी संवाद साधताना व्यक्त केले. परंडा शहरात शुक्रवारी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले दौऱ्यावर आले असता शासकीय विश्रामगृहावर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी रिपाइंचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे, पक्षाचे महाप्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, महाराष्ट्र जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे, रवी माळाळे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. केंद्रींय मंत्री रामदास आठवले पुढे म्हणाले की, गोहत्या बंदी कायदा लागू केला ते योग्यच आहे. कारण हिंदू धर्मात गाईला महत्त्व आहे. त्यांचे संरक्षण झालेच पाहिजे. गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे भाकड जनावरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत मी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे. मी भूमच्या दौऱ्यावर असताना काही शेतकऱ्यांनी निवेदन दिले. गोवंश कायद्याबाबत फेरविचारासाठी सरकारशी चर्चा केली जाईल. परंडा हा पूर्वीचा तालुका राहिला नाही. रस्ते झाले आहेत, सिंचन वाढले असून उसाचे क्षेत्र वाढल्याने सर्वत्र हिरवेगार दिसत आहे. त्यामुळे समाधान वाटले. यानंतर रामदास आठवले पुढील दौऱ्यासाठी कुर्डुवाडीकडे रवाना झाले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग्रा. पोलिस स्टेशन धाराशिव येथे गोमय राखी रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव येथील ग्रामीण पोलिस ठाणे येथे दि . २२ शुक्रवार रोजी सकाळी येडशी येथील मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळ व सामाजिक संस्थेची शिखर संस्था म्हणून ओळखली जाणारी महाएनजीओ फेडरेशन यांच्या वतीने गोमय राखी रक्षाबंधन कार्यक्रम मोठया उत्साहत संपन्न झाला.गोमय ही राखी पंचगव्य आणि गाईच्या बियाणा पासुन बनवली आसून ति सेंद्रीय आहे.यामुळे ही राखी पर्यावरण पुरक व प्रदुषण टाळणेसाठी ही राखी बनवली आहे .हा कार्यक्रम पोलिस निरीक्षक मनिष पाटिल यांच्या व्यवस्थापणे खाली व पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत सुभाष बनसोडे व संपादिका शीला उंबरे पेंढारकर, सामाजिक कार्यकर्ते आगतराव धोंगडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.ठाणे आंतर्गत येणाऱ्या पोलिस अधिकारी कॉनिस्टेबल यांना पत्रकार सौ प्रतिमा सस्ते,सौ वंदना कुलकर्णी,सौ नंदिनी लोमटे,सौ ज्ञानेश्वरी अनपट यांनी सामाजिक दृष्टीकोण समोर ठेऊन राख्या बांधल्या. यावेळी कु.जान्हवी सस्ते हिने हार्मोनियम वादन करत प्रार्थना सादर केली यामुळे उपस्थीतीत पोलिस प्रशासनाने कौतुक करत कले विषय रूची दाखवत भरभरून कौतुक केले.या कार्यक्रमाचे नियोजन एम ,जा ,बप्पा सस्ते वारकरी सेवा मंडळाचे सचिव महादेव सस्ते कार्यक्रम समन्वयक सौ प्रतिमा सस्ते यांनी केले .

**महिला पोलिसांना ही बांधल्या राख्या**

रक्षाबंधन हे बहिणीने भावाला राखी बांधने व भावाने रक्षण करणे , सुरक्षा देणे हा होतो हा दृष्टी कोण समोर ठेऊन समाजाचे रक्षण करणाऱ्या महिला पोलीस एक रक्षक आहेत व त्या रक्षण करतात हा दृष्टीकोण संस्थेने सामोर ठेऊन महिला पोलिसांना ही राख्या बांधन्यात आल्या.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयास AAA समितीची भेट



धाराशिव (प्रतिनिधी)- श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित,रामकृष्ण परमहंस महाविद्यालयास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या AAA समितीने नुकतीच भेट दिली.

सदर समितीने शैक्षणिक,प्रशासकीय आणि संपूर्ण पायाभूत सुविधांची तपासणी करून शिफारशी सुचविल्या आहेत. महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या मुख्यमंत्री प्रशिक्षण योजना आणि विज्ञान विभागातील सीआरसी प्रयोगशाळा या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

पदवी आणि पद्युत्तर पदवीसाठी सलग दोन वेळा विद्यापीठांमध्ये सुवर्णपदक मिळवणारी वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी स्वप्नाली मगर हिचे कौतुक केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी आपल्या पीपीटी सादरीकरणामधून संपूर्ण महाविद्यालयाची माहिती समिती समोर सादर केली. आणि दिवसभर संपूर्ण विभागाची पीपीटी द्वारे आणि प्रत्यक्ष भेट देऊन समितीने पाहणी केली.

या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार, तर सदस्य डॉ.एस पी थोरात , प्रोफेसर डॉ. ए. एस.कुंभार, डॉ. एस.आर.कट्टीमणी, डॉ.जी. के. सोनटक्के,डॉ.संदीप पाटील हे होते.

सदर समितीचे नियोजन प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या तयार करून करण्यात आली होते.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.मंगेश भोसले यांनी समितीचे नियोजन करण्यासाठी परिश्रम घेतले.

## येडशी येथे प्रशासकिय पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार सोहळा संपन्न

### सौ. प्रतिमा सस्ते व सौ. प्रमिला पवार यांचा झाला सन्मान



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर पुरस्कार २०२५ हा ग्रामपंचायत कार्यालय येडशीच्या वतीण ग्रामीण क्षेत्र आंतर्गत दोन महिलांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराची निवड १५ ऑगस्ट रोजी सौ.प्रतिमा महादेव सस्ते व सौ.प्रमिला हरिश्चंद्र पवार यांची प्रस्तावीत प्रस्तावानुसार पडताळाणी करून जाहिर करण्यात आला होता व त्याचे वितरण सोहळा २२/८/२०२५ रोजी करण्यात आला .

हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाकडून सामाजिक,आरोग्य, महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या २ महिलांना देण्यात येतो या मध्ये पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल,श्रीफळ व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात येते याच स्वरूपात सौ प्रतिमा सस्ते व सौ प्रमिला पवार यांना देऊन सन्मानीत करण्यात आले

या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय येडशी येथे गावच्या महिला सरपंच डॉ सोनिया पवार यांच्या अध्यक्षतेखाली तर ग्रामविकास अधिकारी गणेश भगत यांच्या मार्गदर्शने हा कार्यक्रम संपन्न झाला .

पुरस्काराचे वितरण सरपंच डॉ. सोनिया पवार व उपसरपंच स्वाती शेळके यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरनं करण्यात आले या कार्यक्रमाची सुरवात कु जान्हवी सस्ते हिने हार्मोनियम वादन करत प्रार्थना सादर केली.

यावेळी माजी उपसरपंच प्रिया सस्ते,डॉ प्रशांत पवार, तसेच येडशी गावातील आशा कार्यकर्त्या,अंगणवाडी सेविका व गावातील महिलांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला .

यावेळी बोलताना पुरस्कारकर्त्या सौ प्रतिमा सस्ते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार का दिला जातो व त्याच्याबद्दल सविस्तर माहिती देत आपले मनोगत मांडले.तर सौ प्रमिला पवार या अशा कार्यकर्त्यांच्या सुपरवा्यझर असून हा माझा सत्कार नसून माझ्या संपूर्ण टीमचा हा सत्कार आहे आसे मत मांडले.तर अशा कार्यकर्त्यां सीमा कदम यांनी माझ्या गावच्या लेक व सून यांचा सत्कार हा सन्मान म्हणजे आमचा सत्कार आहे आसे मनोगत व्यक्त करत कौतुक व आभिनंदन केले.माजी उपसरपंच प्रिया सस्ते यांनी शुभेच्छा देत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले .

अध्यक्षीय भाषणात बोलताना सरपंच डॉ.सोनिया पवार यांनी सस्ते व पवार यांनी सामाजिक कार्य तेवत ठेऊन समाजहित साधावे आसे मनोगत व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा देत गावच्या वतीने अभिनंदन केले . या कार्यक्रमाचे येडशीगावचे ग्रामविकास अधिकारी गणेश भगत यांनी आभार मानले .

## गणेश आगमनानिमित्त जिल्ह्यात दारूविक्री बंद

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात २७ ऑगस्ट २०२५ रोजी श्री गणेश आगमन (मूर्ती स्थापना) उत्सव साजरा होणार आहे.उत्सव शांततेत व सुसंवादाने पार पडावा,यासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायदा,१९४९ मधील कलम १४२ (१) अन्वये धाराशिव जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या एका दिवसासाठी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध कायद्यानुसार अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## पालकमंत्र्याच्या हस्ते दीपक लाव्हरेपाटील यांचा सन्मान




धाराशिव (प्रतिनिधी)- येथील घरातून कोणासही काहीही न सांगता निघून गेलेल्या दोन बालकांना शोधून त्यांचे आई-वडिलांचे ताब्यात सुखरूप देऊन पोलीस हवालदार श्री. दिपक महादेव लाव्हरेपाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. तसेच शहरातील शाळा,कॉलेज, क्लासेस व रहदारीच्या ठिकाणी छेडछाड करणारे,दादागिरी करणारे गुंडगिरी करणारे तसेच वाहनांना कर्णकर्कश हॉर्न बसवून शांतता भंग करणाऱ्या टवाळखोरावर योग्य ती कार्यवाही करून शहरात शांतता राखण्याचेही उत्कृष्ट कार्य केलेले आहे. तसेच त्यांनी शाळा कॉलेज व क्लासेस मधील विद्यार्थ्यांना कायदे विषयी,स्पर्धा परीक्षा,पोलीस भरती, आर्मी भरती व खेळांबाबत योग्य मार्गदर्शन करून त्यांना वाईट गोष्टी पासून दूर राहण्यासाठी मोलाची कामगिरी केली आहे. म्हणून पोलीस विभागाचे पोलीस हवालदार श्री. दिपक महादेव लाव्हरेपाटील नेमणूक भरोसा सेल महिला छेडछाड विरोधी पथक धाराशिव यांचा स्वातंत्र्य दिना दिवशी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे श्री.पालकमंत्री श्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच जिल्ह्याचे पोलीस अधीक्षिका यांनीही त्यांना स्वातंत्र्य दिना दिवशी प्रशंसापत्र देऊन सत्कार केला. व तसेच श्रीपतराव भोसले हायस्कूल यांच्यामार्फत त्यांना मानपत्र देऊन त्यांचा यथोचित गौरव केला.

त्यांच्या या उत्कृष्ट कार्याबद्दल विविध सामाजिक संस्थांनी व शैक्षणिक संस्थांनी सन्मानपत्र व मानपत्र देऊन त्यांचा गौरव देखील केलेला आहे.

सध्या दिपक लाव्हरेपाटील यांच्या कामाचे कौतुक विद्यार्थी पालक शिक्षकासह वाहन चालक व शहरातील व्यापारी देखील करत आहेत शहरात सध्या श्री. दिपक लाव्हरेपाटील यांची खूप गरज आहे.

